# हवामान आधारीत कृषि सल्ला
# ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
# कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

**३३) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २३.०६.२०२६**

जिल्हा : धुळे

| मागील आठवड्यातील हवामान (१६/०६/२०२६ ते २२/०६/२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (२४/०६/२०२६ ते २८/०६/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | < दिनांक > | २४ | २५ | २६ | २७ | २८ |
| | | | | | | | पाऊस (मिमी) | १२ | ९ | ७ | ५ | ६ |
| | | | | | | | कमाल तापमान (अंसे) | ३५ | ३५ | ३४ | ३४ | ३४ |
| | | | | | | | किमान तापमान (अंसे) | २६ | २६ | २५ | २५ | २५ |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | ४ | ५ | ५ | ४ | ५ |
| | | | | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ७० | ७२ | ७१ | ७० | ६८ |
| | | | | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६७ | ७० | ६७ | ६७ | ६१ |
| | | | | | | | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | १६ | १८ | २० | १९ | २२ |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार, **पुढील पाच दिवस आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. पुढील पाच दिवस काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.** |
| सामान्य सल्ला | | **पिक निहाय खरीप पिकाच्या पेरणीचा कालावधी ७ ते १५ जुलै पर्यंत असल्याने जमिनीमध्ये पुरेशी ओल निर्माण झाल्यावरच पेरणी करावी.**<br>विजेचा पुर्वानुमान मिळणेकरीता दामिनी मोबाईल अपचा वापर करावा.<br>हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा. |
| संदेश | | **पावसाची सुरवात झाल्यानंतर किमान ८०–१०० मिमी पाऊस झाल्यानंतरच खरीप पिकांची पेरणी करावी. कोरड्या जमिनीत घाईघाईने पेरणी टाळावी.** |
| खरीप नियोजन | | १) जमिनीची खोली लक्षात घेऊन त्याप्रमाणे पिकांचे नियोजन केल्यास अवर्षणवर्षी उत्पादनात स्थिरता आणण्यास मदत होईल.<br>२) उपलब्ध जमिनीनुसार पिक व वाणांची निवड करावी.<br>३) आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा.<br>४) कमी कालावधीच्या वाणांचा वापर करावा.<br>५) कमी पाण्यावर येणाऱ्या वाणांचा वापर करावा.<br>६) पाण्याचा व तापमानाचा ताण सहनशील पिके व त्यांचे वाण वापरावेत.<br>७) पिकाची पेरणी ट्रॅक्टर चलित बीबीएफ पेरणी यंत्राने रुंद सरी वरंबा (BBF) पद्धतीने करावी.<br>८) पावसाचे पाणी साठवण (शेततळे, कंपार्टमेंट बंडिंग, सरी-वरंबा पद्धत)<br>९) ओलावा संवर्धन (आच्छादन (Mulching), कोळपणी, तण नियंत्रण)<br>१०) ठिबक तसेच तुषार सिंचन पद्धतीचा वापर करावा.<br>११) संतुलित खत व्यवस्थापन पत्रिकेचा खत व्यवस्थापनासाठी वापर करावा.<br>१२) जिल्हानिहाय कृषी हवामान आधारित हवामान सल्ल्याचे नियमित पालन करणे.<br>१३) रसशोषक किडींच्या जैविक नियंत्रणासाठी पीकाच्या अवस्थेनुसार पिवळे चिकट सापळे, सापळा पीके, जैविक बुरशीनाशके (मेटारायझीयम, ट्रायकोग्रामा, व्हरटीसिलीयम इ.) यांचा वापर करावा.<br>१४) पेरणी करिता उशीर झाल्यास महात्मा फुले कृषी विद्यापीठाद्वारे तयार करण्यात आलेल्या “आपात्कालीन पीक नियोजन” या मार्गदर्शक पुस्तिकेचा उपयोग करावा. तसेच उशिरा पेरणीसाठी पर्यायी बियाणे उपलब्ध ठेवावे. |
| कपाशी | उगवण | राज्यात काही भागांत कपाशीची पेरणी झाल्यानंतर उगवण चांगली झाली आहे. परंतु उगवण झाल्यानंतरही अद्याप बऱ्याच ठिकाणी समाधानकारक पाऊस झालेला नाही. अशा ठिकाणी कपाशीची लागवड होऊन ५–१० दिवस झालेले असल्यास कपाशी पिकास पाण्याचा ताण पडू शकतो. उगवणीनंतर ५–६ दिवसांच्या कपाशीच्या रोपांमध्ये दलपत्रे व अतिशय कोवळी खरी पाने असतात. या अवस्थेत पिकाची मुळे पूर्णपणे विकसित झालेली |

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| | | नसतात त्यामुळे पाण्याचा ताण पडल्यास रोपांची वाढ काहीशी मंदावू शकते.<br>**शेतकऱ्यांसाठी शिफारसी:**<br>१) उच्च तापमान व कमी आर्द्रतेच्या परिस्थितीत कोवळया पाने करपण्याची शक्यता असते.<br>२) १% युरिया (१० ग्रॅम/लिटर पाणी) याची हलकी फवारणी सकाळी किंवा सायंकाळी करावी.<br>३) सिंचनाची सुविधा उपलब्ध असल्यास हलके संरक्षित पाणी द्यावे.<br>४) आच्छादनाचा उपयोग करून जमिनीतील ओलावा जतन करावा.<br>५) अनावश्यक कोळपणी किंवा मशागत टाळावी.<br>६) तणांचा प्रादुर्भाव असल्यास त्यांचे नियंत्रण करावे, कारण तण जमिनीतील उपलब्ध ओलावा शोषून घेतात.<br>७) पुरेशा ओलाव्याशिवाय किंवा पाऊस पडण्यापूर्वी नत्रयुक्त वरखत देऊ नये.<br>८) पाऊस पडल्यानंतर शिफारशीनुसार पुढील वरखते द्यावे. |
| **पिकांची निवड** | **जमिनीच्या खोलीनुसार** | **भारी:** कापूस, तूर, सोयाबीन<br>**मध्यम:** सूर्यफूल, तूर, बाजरी, सोयाबीन<br>**हलकी:** बाजरी, कुळीथ, तीळ, कारळा, एरंडी |
| **पशूसंवर्धन** | **-** | जनावरांच्या पिण्यात दूषित किंवा गाळ मिश्रण पाणी जाणार नाही याची काळजी घ्यावी. जनावरांचे जंत निर्मूलन करून घ्यावे. कोवळया गवतामुळे होणारी बुळकांडी रोगाकरिता सल्फा गोळयाचा वापर करावा.<br>जनावरांना उत्तम संतुलित आहार द्यावा. जनावरांचा गोठा स्वच्छ, कोरडा व हवेशीर ठेवणे व वेळोवेळी निर्जंतुकीकरण करणे महत्त्वाचे आहे. औषधे देतांना औषध योग्य मात्रेतच द्यावे.<br>जनावरांना मोकळया जागेत बांधू नये. त्यांना गोठा, शेड किंवा मजबूत इमारतीत ठेवावे. |

**स्त्रोत** :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान :

ठिकाण : मफुकृवि, राहुरी.
दि. : २३.०६.२०२६

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**
**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**